
क्र. ११९ पहिले वर्ष

११ डिसेंबर २०२२

# रविवारची  उपासना

## आगमनकाळातील तिसरा रविवार

## प्रस्तावना

आगमनकाळातील तिसरा रविवार आपल्यासमोर आशेचा दिवा पेटवत आहे. आजच्या पहिल्या वाचनात यशया संदेष्टा प्रभूच्या आगमनाविषयी सांगत आहे. देवपित्याने दिलेल्या अभिवचनाची पूर्णता होईल. देवाचा पुत्र जगात येईल आणि आपल्या सर्वांचे तारण करील. देवपुत्र आपल्याबरोबर त्याच्या लोकांसाठी ईश्वरी कृपा घेऊन येईल व त्यामुळे जगात सर्वत्र शांतीचे व प्रेमाचे वातावरण निर्माण होईल, परंतु तो येईपर्यंत त्याची वाट पाहत असताना त्याचा स्वीकार करण्यासाठी आपली अंत:करणे स्वच्छ करून आपल्यातील गर्व, मत्सर दूर करून आपले हृदय सद्गुणांनी भरले पाहिजे. म्हणून संत योहान बाप्तिस्मा पुन्हा पुन्हा संदेश देतो की, ''पश्चात्ताप करा, स्वर्गाचे राज्य जवळ येत आहे.'' आपले वाईट मार्ग सोडून द्या. मग आपण अंधाराच्या मार्गाने का जातो? जगाचा प्रकाश असलेल्या प्रभू येशूकडे आपली दृष्टी लावण्यास आपल्याला कृपा व सामर्थ्य लाभावे म्हणून आपण पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करू या.

## प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या**

हे प्रभो, परमेश्वरा, प्रभू ख्रिस्ताच्या जन्मदिवसाची आम्ही मोठ्या उत्सुकतेने वाट पाहात आहोत. त्याच्या जन्मदिवशी आमची हृदये आनंदाने भरावीत आणि मोठ्या भक्तिभावाने व उपकारबुध्दीने हा सण साजरा करता यावा म्हणून आम्हांला कृपा दे. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

## पहिले वाचन

**यशयाच्या पुस्तकातून घेतलेले वाचन ३५:१-६अ, १०**

**''परमेश्वर स्वत: येईल आणि आमचा उध्दार करील.''**

अरण्य आणि रुक्ष भूमी ही हर्षतील. वाळवंट उल्हासेल आणि कमलाप्रमाणे फुलेल. ते अत्यंत प्रफुल्लित होईल. आनंदाने गाऊन ते उत्सव करील. लबानोनाची शोभा त्याला मिळेल. कर्मेल आणि शारोन यांचे ऐश्वर्य त्याला प्राप्त होईल. ती परमेश्वराचे वैभव आमच्या देवाचे ऐश्वर्य पाहतील.

गलितहस्त दृढ करा. लटपटणारे गुडघे बळकट करा. घाबऱ्या मनाच्या लोकांना म्हणा, धीर धरा. भिऊ नका. पाहा, तुमचा देव सूड घ्यावयास अनुरूप असे प्रतिफळ द्यावयास येईल. तो येईल आणि आमचा उध्दार करील.

तेव्हा अंधाचे नेत्र उघडतील. बहिऱ्याचे कान मोकळे होतील. तेव्हा लंगडा हरिणाप्रमाणे उड्या मारील. मुक्याची जीभ गजर करील. मुक्त केलेले परमेश्वराचे लोक परत येतील. ते जयजयकार करीत सीयोनेत येतील. त्यांच्या मस्तकी अक्षय आनंद राहील. ते आनंद आणि हर्ष पावतील. दु:ख आणि उसासे पळ काढतील.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

## प्रतिसाद स्तोत्र

**स्तोत्र : १४५:६क-७,८-९, ८क-१०**

प्रतिसाद : **''हे प्रभो, ये आणि आमचा उध्दार कर.''**

१. तो सदैव सत्यवचनी असतो. तो
छळलेल्यांना न्याय देतो. भुकेल्यांना अन्न
देतो. प्रभू बंदिवानांना मुक्त करतो. (प्र.)

२. प्रभू आंधळ्यांना दृष्टी देतो. प्रभू वाळून
गेलेल्यांना ताठ उभे करतो. प्रभू परक्यांना
सांभाळतो. अनाथ आणि विधवा यांची दाद
घेतो. (प्र.)

३. प्रभू सज्जनांवर प्रेम करतो. पण दुर्जनांचे बेत फिसकटून टाकतो. प्रभू
सदासर्वदा राज्य
करील. सीयोमा, तुझा देव पिढ्यान्‌पिढ्या
राज्य करील. (प्र.)

## दुसरे वाचन

**संत याकोबाच्या पत्रातून घेतलेले वाचन ५:७-१०**

**आपली अंत:करणे स्थिर करा, कारण प्रभूच्या आगमनाची वेळ जवळ आली आहे.**

अहो बंधूजनहो, प्रभूच्या आगमनापर्यंत धीर धरा. पाहा, शेतकरी भूमीच्या मौल्यवान पिकाची वाट पाहात असता, त्यास पहिला आणि शेवटचा पाऊस मिळेपर्यंत त्याविषयी तो धीर धरतो. तुम्हीही धीर धरा. आपली अंत:करणे स्थिर करा, कारण प्रभूच्या आगमनाची वेळ जवळ आली आहे. बंधूनो दोषी ठरू नये म्हणून एकमेकांविषयी कुरकूर करू नका. पाहा, न्यायाधीश दाराजवळ उभा आहे. बंधूनो, जे संदेष्टे प्रभूच्या नावाने बोलले त्यांचे दु:खसहन आणि त्यांचा धीर यांविषयीचा कित्ता घ्या.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

## जयघोष

**लूक ४:१८**

**आलेलुया, आलेलुया!**

परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे.
दीनांस सुवार्ता सांगण्यास त्याने मला
अभिषेक केला आहे.

**आलेलुया!**

## शुभवर्तमान

**संत मत्तयच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ११:२-११**

**ज्याचे आगमन होणार आहे ते आपणच की आम्ही आणखी कुणाची वाट पाहावी?**

इकडे योहान तुरुंगात असताना त्याने ख्रिस्ताच्या कार्याविषयी ऐकून आपल्या शिष्यांकरवी त्याला निरोप पाठवून विचारले, ''ज्याचे आगमन

होणार आहे ते आपणच की आम्ही आणखी कुणाची वाट पाहावी?''

येशूने त्यांना उत्तर दिले, ''जे तुम्ही ऐकता आहात आणि पाहात आहात ते जाऊन योहानाला सांगा. आंधळ्यांना दृष्टी प्राप्त होते, पंगू चालतात, महारोगी शुध्द होतात, बहिऱ्यांना ऐकू येते, मेलेले जिवंत केले जातात आणि गरीबांना शुभसंदेश ऐकवला जातो. ज्याला माझी अडचण वाटत नाही तो धन्य.'' योहानाचे जासूद जायला निघाले तेव्हा येशू जमावाला योहानाविषयी विचारू लागला, ''तुम्ही रानावनात काय पाहायला गो होता? वाऱ्याच्या झोकावर डोलणारे बोरू काय? नाही, तर मग काय पाहायला गेला होता? भरजरी वस्त्रे घालणाऱ्या माणसाला पाहायला काय? अहो, तलम वस्त्र धारण करणारे राजवाड्यात असतात. मग कशाला तिकडे गेला होता? एखाद्या प्रवक्त्याला पाहायला काय? अर्थात मी म्हणतो. प्रवक्त्यापेक्षाही श्रेष्ठ आहे त्याला. ''पहा, मी आपला जासूद तुझ्याअगोदर पाठवीत आहे. पुढे जाऊन तो तुझ्यासाठी मार्ग खुला करील,'' असे ज्याच्याविषयी धर्मशास्त्रात म्हटले आहे तो हाच. मी तर खरेच सांगतो, स्त्रीच्या पोटी जन्माला आलेल्या सर्वात योहानापेक्षा श्रेष्ठ असा कुणी झाला नाही. मात्र स्वर्गराज्यातला सर्वात कनिष्ठ तो त्याच्यापेक्षाही श्रेष्ठ आहे.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, प्रभू येशू ख्रिस्ताच्या आगमनाची आम्ही तयारी करीत आहोत. त्याच्या दयेची आपण कळकळीने याचना करू या. दीन जनांना सुवार्ता घोषित करण्यासाठी आणि पश्चात्तापी पाप्याला बरे करण्यासाठी तो या जगात आला. आजच्या जगात त्याने पुन्हा यावे आणि सर्व गरजवंतांना मुक्तिदान द्यावे म्हणून आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या.

**प्रतिसाद :** हे प्रभो, तुझे स्वागत करण्यास आमचे अंत:करण शुध्द ठेव.

१. पोप, बिशप्स, फादर्स, सिस्टर्स ह्यांनी आपणास पश्चात्तापी अंत:करणाने परिवर्तन घडवून आणण्यास मार्गदर्शन करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. ख्रिस्ताचा गौरवमय प्रकाश आपल्या अंत:करणात यावा व त्याचा आपण आनंदाने स्वीकार करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. ख्रिस्ताचे स्वागत आपल्या हृदयात होण्यासाठी आपण रोज बायबल चिंतन व प्रार्थना करावी. प्रभूसाठी आपली हृदये दैवी कृपेने शुध्द व्हावी म्हणून प्रार्थना करू या.

४. मरीयेने ख्रिस्ताला या जगात जन्म देण्यासाठी विश्वासाने देवाच्या हाकेला प्रतिसाद दिला, तीच श्रध्दा आपल्या हृदयात वाढावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे सर्वसमर्थ आणि नित्यजिवी परमेश्वरा, तुझ्यापासून कोणीही दूर जाऊ नये आणि सर्वांनी आपले तारण प्राप्त करून घ्यावे अशी तुझी मानवजातीकडून अपेक्षा आहे. तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या शांतीने तू जगाला मार्गदर्शन कर आणि मन:स्वास्थ्य व आनंद यांद्वारे तुझ्या ख्रिस्तसभेला तुझी सेवा करू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, परमेश्वरा, श्रध्देने व भक्तिभावाने आम्ही तुला हे दान अर्पण करीत आहोत. ह्या दानामुळे तुझा सन्मान होवो. हे दान आमच्या आभाराचे प्रतीक बनो व तुझ्याकडून आम्हा सर्वांना तारणाचे वरदान प्राप्त होवो. ही प्रार्थना आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, दयाळू परमेश्वरा, ह्या ख्रिस्तप्रसादामुळे आम्हांला आध्यात्मिक शक्ती प्राप्त होवो, पापांपासून आमची सुटका होवो आणि प्रभू ख्रिस्ताची जयंती साजरी करण्यास आम्ही पात्र ठरोत. तो परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

## चिंतन

आगमनकाळातील पहिल्या टप्प्याच्या अंतिम भागात असताना ख्रिस्तसभा आपल्याला आणखी तीन विचार देते :

**अ) प्रभूची वाट पाहात असताना त्याची दया गृहीत धरू नये :** इस्राएली लोकांना परमेश्वराच्या क्रोधाची जाणीव होती. परमेश्वर इस्राएली लोकांना शिक्षा ठोठावतो तेव्हा तो शिस्तीचा भाग असतो मात्र तो परराष्ट्रीयांना शिक्षा करतो तेव्हा तो त्याच्या सार्वभौम अधिकाराचे द्योतक असते. आजचे पहिले वाचन (यशया ३५:१-६अ,१०) दुसऱ्या प्रकारात मोडते. प्रभूची वाट पाहात असताना त्याचा सार्वभौम अधिकार मान्य करावा लागतो.

**ब) प्रभूची वाट पाहताना धीर व चिकाटी बाळगावी :** दुसऱ्या वाचनात शेतकरी, न्यायाधीश व ईयोब ह्यांचे दाखले देण्यात आलेले आहेत (याकोब ५:७-१०). ईयोब संकटात संयमी राहिला, शेतकरी धीराने फळाची वाट पाहतो मात्र न्यायाधीश नेहमी दाराशी उभा आहे हे जिद्दी श्रध्दावंताने विसरू नये.

**क) प्रभूची वाट पाहण्याला सत्याची भक्कम बैठक असावी :** शुभवर्तमानामध्ये (मत्तय ११:२-११) संत योहानच्या सत्यनिष्ठेसाठी 'वाऱ्याने डोलणारा बोरू' व त्याच्या वैराग्यासाठी 'तलम वस्त्र पांघरणारे' अशा विरूध्द प्रतिमा मत्तय वापरतो. योहानची जीवनशैली 'मार्ग, सत्य व जीवन' असलेल्या प्रभूच्या स्वागताशी साजेशी होती.

**आत्मपरीक्षण :** प्रभूची वाट पाहताना मी कोणती मनोवृत्ती धारण करतो?

●●●

| डिसेंबर २०२२ | दैनंदिन बायबल वाचने तिसरा सप्ताह |
|---|---|
| सोम १२ ग्वाडालुपेची मरिया. मा.(जां) | : गणना २४:२-७, १५-१७/ मत्तय २१:२३-२७ |
| मंगळ १३ सं ल्यूसी (तां) | : सफन्या ३:१-२, ९-१३/मत्तय २१:२८-३२ |
| बुध १४ क्रूसभक्त सं. जॉन (पां) | : यशया ४५:६-२५/ लूक ७:१९-२३ |
| गुरु १५ सं. वेनांशिअस फॉर्च्युनाटूस (पां) | : यशया ५४:१-१०/लूक ७:२४-३० |
| शुक्र १६ सं व्हेलेरियन (जां) | : यशया ५६:१-८/योहान ५:३३-३६ |
| शनि १७ सं लाझरस (जां) | : उत्पत्ती ४९:२, ८-१०/ मत्तय १:१-१७ |